# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११० वा ❑ भारतीय सौर दिनांक १९ ज्येष्ठ शके १९४८, मंगळवार दि.०९ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला सरकारची स्थगिती

## हरकतींनंतर बावनकुळे यांची मोठी घोषणा

ज्योतिर्मय 📖 साहित्य

मुंबई (उपेंद्र कुलकर्णी)– महाराष्ट्रातील देवस्थानांच्या जमिनींसंदर्भात मोठा वाद निर्माण करणाऱ्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ ला राज्य सरकारने अखेर स्थगिती दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही घोषणा करत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती, आक्षेप आणि सूचनांचा आदर राखून हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले.

राज्यातील देवस्थानांच्या अतिक्रमित जमिनी मूळ धार्मिक संस्थांच्या ताब्यात परत मिळाव्यात, या उद्देशाने सरकारने हा कायदा आणण्याचा प्रस्ताव मांडला होता. यासाठी ५ मे २०२६ रोजी प्रारूप मसुदा प्रसिद्ध करून नागरिकांच्या सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या होत्या. मात्र मसुदा जाहीर होताच विविध हिंदुत्ववादी संघटना, देवस्थान ट्रस्ट, धार्मिक संस्था तसेच काही राजकीय पक्षांनी तीव्र विरोध दर्शविला.



विरोधकांनी या कायद्यामुळे मंदिरे, मठ आणि धार्मिक संस्थांच्या मालकी हक्कांवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली. तसेच देवस्थानांच्या जमिनी खासगी व्यक्ती किंवा भू-माफियांच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण होईल, असा आरोपही करण्यात आला. वाढता विरोध आणि मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेल्या हरकती लक्षात घेऊन सरकारने कायदा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या राजे-महाराजे, संस्थानिक आणि जमीनदारांनी मंदिरांच्या पूजा-अर्चा, अन्नछत्रे आणि धार्मिक कार्यांसाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी दान दिल्या होत्या. या जमिनी देवस्थान इनाम जमीन म्हणून ओळखल्या जातात. प्रस्तावित कायदा या जमिनींचे व्यवस्थापन, मालकी हक्क आणि वापर यासंदर्भातील नियम निश्चित करण्यासाठी तयार करण्यात आला होता.

राज्य सरकारच्या माहितीनुसार, राज्यातील लाखो हेक्टर देवस्थान जमिनींवर सध्या अतिक्रमण झाले असून अनेक ठिकाणी मूळ धार्मिक संस्थांनाच त्या जमिनींचा लाभ मिळत नाही. त्यामुळे या जमिनी पुन्हा देवस्थानांच्या ताब्यात आणण्यासाठी कायदेशीर चौकट उभारण्याचा प्रयत्न सुरू होता.

दरम्यान, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती प्राप्त झालेल्या सर्व हरकती, आक्षेप आणि सूचनांची सविस्तर सुनावणी करणार असून संबंधित पक्षांशी चर्चा केल्यानंतर नव्याने कायद्याचा मसुदा तयार केला जाणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून देवस्थानांना देण्यात आलेल्या अनेक जमिनींवर आज अतिक्रमण झाले आहे. सुमारे साडेपाच लाख हेक्टर क्षेत्रावरील जमिनी विविध कारणांमुळे देवस्थानांच्या प्रत्यक्ष ताब्यात नाहीत. या जमिनी पुन्हा धार्मिक संस्थांना उपलब्ध करून देण्यासाठी सरकार स्वतंत्र धोरण तयार करत असून त्याबाबत लवकरच निर्णय जाहीर केला जाईल.

कायदा स्थगित झाल्यामुळे सध्या देवस्थान व्यवस्थापन आणि जमिनींच्या हक्कांबाबतचा वाद तात्पुरता शांत झाला असला, तरी अतिक्रमित जमिनींचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकार पुढे कोणता नवा मार्ग स्वीकारते, याकडे राज्यभरातील देवस्थान संस्था, ट्रस्ट आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## विशेष लेख...

### कायद्याचे पालन का होत नाही? एक सामाजिक-राजकीय विश्लेषण

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

कोणतीही कार्य किंवा कोणतीही गोष्ट करण्यासाठी काय नियम कायदे असतात. त्या नियमाचे पालन व्हावे अशी अपेक्षा असते. मात्र कुठेच नियमाचे तंतोतंत पालन होत नाही त्यामुळे अनेक समस्या व अडचणी निर्माण होतात.केवळ आपल्या देशातच नव्हे, तर जगभरात कागदावर नियम अनेक असतात, मात्र राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, प्रशासकीय अनास्था आणि नागरिकांमधील जागरूकतेच्या कमतरतेमुळे त्यांची कडक अंमलबजावणी होत नाही.

उदाहरण घ्यायचे झाल्यास

खाद्यपदार्थांसाठी वर्तमानपत्राचा कागद वापरणे आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. शाईतील विषारी रसायने आणि जड धातू अन्नात मिसळतात, ज्यामुळे कर्करोग आणि यकृताचे आजार होऊ शकतात. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण नुसार, खाद्यपदार्थ गुंडाळण्यासाठी, वाढण्यासाठी किंवा तेल शोषण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर करणे कायद्याने पूर्णपणे प्रतिबंधित आहे.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण () ने फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स (पॅकेजिंग) रेग्युलेशन्स २०१८ नुसार वर्तमानपत्रात अन्नपदार्थ देणे, गुंडाळणे किंवा तेल शोषण्यासाठी त्याचा वापर करणे कायदेशीररित्या प्रतिबंधित केले आहे.

हा कायदा अस्तित्वात असताना खरच या कायद्याचे पालन होते का? हा कायदा अस्तित्वात असून या कायद्याचे कोणीच पालन करत नाही.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी खाद्यपदार्थ बांधण्यासाठी किंवा वाढण्यासाठी वर्तमानपत्राचा कागद वापरण्यावर सक्त बंदी घातली आहे. वडापाव, भजी, भेळ यांसारखे तेलकट पदार्थ वर्तमानपत्रात देणे आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. असे करताना आढळल्यास विक्रेत्यांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा आदेश त्यांनी काढला.मात्र या कायद्याचे पालन होईल का? झाले तर काहीच दिवस.काही दिवसानंतर परिस्थिती जैसे थे राहील. कायद्याचे पालन का होत नाही,हा प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतो.

समाजात कायद्याचे पालन न होणे ही एक अत्यंत गुंतागुंतीची सामाजिक आणि राजकीय समस्या आहे. याचा मुख्य उगम कायद्याची अंमलबजावणी करणारी कमकुवत यंत्रणा, राजकीय अनास्था, सामाजिक विषमतेची दरी, आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामध्ये आढळतो.

अनेकदा कठोर कायदे केवळ देखाव्यासाठी किंवा दबावापोटी बनवले जातात, पण त्यांची अंमलबजावणी केल्यास मतांचे नुकसान होईल या भीतीपोटी नेतेमंडळी त्याकडे दुर्लक्ष करतात.अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय यंत्रणांमध्ये (उदा. पोलीस, पालिका, प्रदूषण मंडळ इ.) भ्रष्टाचाराचे प्रमाण असल्याने नियम मोडणाऱ्यांना सहसा पाठीशी घातले जाते.अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या व त्यांच्यावरील कामाचा अतिरिक्त ताण यामुळे सर्व नियमांची तंतोतंत अंमलबजावणी करणे शक्य होत नाही.

अनेकदा राजकीय नेते, प्रभावशाली व्यक्ती आणि त्यांचे नातेवाईक कायद्याच्या वर असल्यासारखे वागतात, ज्यामुळे सर्वसामान्यांचा कायद्यावरील विश्वास उडतो.

दंड किंवा शिक्षेचे प्रमाण कमी असणे आणि पुराव्याअभावी गुन्हेगार सुटणे (अपराध सिद्धीचे कमी प्रमाण) यांमुळे कायद्याचे पालन करण्याची सक्ती कमी होते.

गुंतागुंतीची कायदेशीर भाषा आणि कायदेसाक्षरतेचा अभाव यामुळे सर्वसामान्य नागरिक नकळतपणे नियमांचे उल्लंघन करतात.

विशेष म्हणजे सामान्य नागरिकांना आपल्या हक्कांची व नियमांची पूर्ण माहिती नसते. तसेच, कारवाईचा त्रास नको म्हणून लोक सहसा आवाज उठवत नाहीत.प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यामुळे दोषी व्यक्तींना कडक शिक्षेपर्यंत पोहोचणे कठीण होते.या समस्येवर मात करण्यासाठी कडक कायदे करण्यासोबतच पारदर्शक यंत्रणा आणि जनआंदोलनांची गरज असते.कोणत्याही लोकशाहीत केवळ कायदे करून प्रश्न सुटत नाहीत, तर पारदर्शक यंत्रणा आणि सजग जनआंदोलने या त्रिसूत्रीवरच खऱ्या अर्थाने सुशासन आणि सामाजिक बदल अवलंबून असतात.

कायद्याचे योग्य पालन व्हावे यासाठी कडक तरतुदी आणि शिक्षेची भिती असणे आवश्यक आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायदे हे पाया मानले जातात. शालेय स्तरापासूनच संविधानाचे आणि कायद्यांचे मूलभूत शिक्षण देणे.



# डॉ मीना श्रीवास्तव तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्काराने सन्मानित

ज्योतिर्मय 📖 साहित्य

कोल्हापूर - डॉ मीना श्रीवास्तव यांना त्यांच्या एक चिरंतन चित्रपट- मुग़ल-ए-आज़म या पुस्तकाला तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार (२०२६) सर्वोत्कृष्ट लेख संग्रह हा साहित्यक्षेत्रातील मानाचा पुरस्कार ६ जून २०२६ रोजी कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आला. तितिक्षा भावार्थ सेवांतर्गत तितिक्षा इंटरनॅशनल पुणे द्वारा आयोजित कोल्हापूर येथील भव्य तितिक्षा कला साहित्य संमेलनात हा पुरस्कार देण्यात आला. तितिक्षा इंटरनॅशनल पुणेच्या संस्थापक-अध्यक्षा मा.प्रिया प्रमोद दामले यांनी डॉ. श्रीवास्तव यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. या प्रसंगी जेष्ठ अभिनेत्री मा. शमा वैद्य, ॲड. तुषाल शिवशरण (स्वागताध्यक्ष), मा. शंकर अदानी (अध्यक्ष, सीता ट्रस्ट अहिल्यानगर) मा. सुजीत दातार (सोल्युशन माइंड, पुणे) मा. राजेश खर्डे वेसावकार (कोळीसम्राट) हे मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रसंगाचे औचित्य साधत डॉ. मीना श्रीवास्तव यांनी प्रिया दामले यांना स्वनिर्मित चित्र भेट म्हणून दिले, तसेच मंचावर उपस्थित असलेल्या जेष्ठ अभिनेत्री मा. श्रीमती वैशाली राजशेखर (जेष्ठ अभिनेते स्व. राजशेखर यांच्या पत्नी) यांना आपले पुस्तक भेट दिले. एक चिरंतन चित्रपट- मुग़ल-ए-आज़म हे डॉ. मीना श्रीवास्तव यांचे पहिलेच मराठी पुस्तक आहे. त्याचे प्रकाशन लोकव्रत प्रकाशनद्वारा करण्यात आले आहे. पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ लोकव्रत प्रकाशनचे सर्वेसर्वा आणि सुप्रसिद्ध लेखक डॉ. शिरीष कुलकर्णी यांनी तयार केले आहे. मुग़ल-ए-आज़म हा नितांतसुंदर चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सुवर्णअध्याय आहे. त्याची १२ वर्षांहून अधिक काळ चाललेली निर्मिती प्रक्रिया हा या पुस्तकाचा प्रमुख विषय आहे. या चित्रपटाच्या संबंधित विषयावर मराठीत हे बहुदा पहिलेच पुस्तक आहे. या प्रतिष्ठित पुरस्काराच्या मानकरी डॉ. मीना श्रीवास्तव यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

## वाचकांच्या चष्म्यातून.....

### 'ज्योतिर्मय' – ज्ञान, संस्कार आणि साहित्यसौंदर्याचा प्रकाशोत्सव!

आजचे 'ज्योतिर्मय' दैनिक वाचताना मन अक्षरशः प्रसन्नतेने उजळून निघाले. आशयसमृद्धता, वैचारिक परिपक्वता, आकर्षक मांडणी आणि वाचनीयतेचा सुरेख संगम या अंकात अनुभवायला मिळाला.

पर्यावरण विषयावरील कविता म्हणजे निसर्गाच्या वेदना आणि संवेदनांचा शब्दबद्ध आविष्कारच वाटला. प्रत्येक ओळ मनाला चिंतनाची नवी दिशा देणारी आणि पर्यावरणसंवर्धनाची जाणीव जागवणारी होती.

सुंदर लेखांनी ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या, तर शब्दांच्या माधुर्यातून विचारांचे नवे क्षितिज उलगडले. लेखनातील अभ्यासपूर्णता आणि विषयवैविध्य हे या दैनिकाचे वैशिष्ट्य ठरले आहे.


विशेषतः पान क्रमांक दोनवरील अध्यात्म विभाग हा अंतर्मनाला स्पर्श करणारा, आत्मचिंतनाची दारे उघडणारा आणि जीवनमूल्यांची जाणीव करून देणारा असा विलक्षण अनुभव ठरला. अध्यात्माचा गाभा सहज, सरळ आणि प्रभावी शब्दांत मांडण्याची कला खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

तसेच संजय उवाच- अत्यंत चित्तवेधक, विचारप्रवर्तक आणि मनाला खिळवून ठेवणारे वाटले. विषयाचे सखोल आकलन, ओघवती भाषा आणि प्रभावी मांडणी लक्षवेधक झालेली आहे.

एकंदरीत, 'ज्योतिर्मय' हे केवळ दैनिक नसून ज्ञान, संस्कार, साहित्य, अध्यात्म आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर मिलाफ घडवणारे एक वैचारिक दालन आहे. प्रत्येक अंक वाचकांच्या मनात नवा प्रकाश प्रज्वलित करीत राहो आणि या ज्ञानयज्ञाची ज्योत अशीच अखंड तेवत राहो, ही सदिच्छा!

🌹💐 संपादक मंडळ व सर्व लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा! 💐🌹

✍️सुनिता कावसनकर,
साहित्यिक, प्रकाशक, कवयित्री,
छत्रपती संभाजीनगर. मो. 83908 19446



## जात्यावरच्या ओव्या......

मावेना मांडवात
दहा गावच्या बहिणी
सुखदु:खाच बोलता
आल डोळ्यात पाणी ॥ ६८१॥

मावेना मांडवात
भाचे झाले गोळा
ओळखते दुरूनच
भाऊ तुझा तोंडवळा ॥६८२॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९

ज्योतिर्मय साहित्य

**जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे ।**
**जयाचेनि योगे समाधान बाणे।**
**तयालागी हे सर्व चांचल्य दीजे ।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे ॥३९॥**

अर्थ : ज्या परमेश्वराचे वर्णन वेद, शास्त्रे आणि पुराणे करतात, ज्याच्या जवळ गेल्याने आपल्याला अक्षय समाधान लाभते, अशा परमेश्वराला आपल्या मनातील सर्व प्रकारची चंचलता अर्पण करावी. मनाने त्याचेच होऊन राहावे.




विवेचन : माणूस आयुष्यभर सुखाच्या पाठी धावत असतो परंतु एवढी धावपळ करूनही आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्याला ते गवसत नाही. आपल्या पूर्वजांनी ऋषीमुनींनी देखील समाधानाचा शोध घेतला अखेरीस त्यांना ते भगवंताच्या ठिकाणीच आहे असे आढळून आले. त्याचेच वर्णन आपले वेद, शास्त्रे आणि पुराणे करतात. म्हणून समर्थ देखील आपल्याला सांगतात की जयाचेनि योगे समाधान बाणे. त्याचा योग म्हणजे संबंध आला की अंगी समाधान बाणते म्हणजे त्याची प्रचिती येते.

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.

एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही. **(क्रमश:)**

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏


## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ श्रीमंती
पैसा असणे म्हणजे श्रीमंत नाही, शिक्षण असणे म्हणजे सुशिक्षित नाही श्रीमंत असण्यासाठी मन श्रीमंत लागत पैसा नाही, आणि अक्कल असण्यासाठी बुद्धिमत्ता आवश्यक आहे फक्त शिक्षण नाही.

## अखंड नामस्मरणात राहणे म्हणजेच उपासना



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देवाच्या आड काय बरे येत असते ? आपल्याला देवाची प्राप्ती होत नाही याला वास्तविक आपणच कारण असतो. आपण लोकांना त्याबद्दल दोष देत असतो, पण इतर लोक त्याच्या आड येत नसून आपण स्वत:च आड येत असतो, हे थोडा विचार केला असताना समजून येईल. ज्याला आपले म्हणायला पाहिजे होते त्याला आपले न म्हणता, आपण दुसऱ्या कुणाला तरी आपले म्हणत असतो. आपला मुलगा, बायको, भाऊ, या सर्वांना आपले म्हणत असतो. हे सर्वजण काही मर्यादेपर्यंत आपले असतात. परंतु देवाला जर आपण आपले म्हटले, तर तो सदासर्वकाळ आपलाच असतो, आणि आपल्याला तो मदत करायला तयार असतो. तुम्हा सर्वांना द्रौपदीची गोष्ट माहीत आहे ना ? आपले भ्रतार आपले रक्षण करतील असे तिला वाटत होते. परंतु त्या कोणाकडून काही होणे शक्य नाही असे तिला दिसले, तेव्हा तिने अनन्यतेने श्रीकृष्णाचा धावा केला आणि तेव्हाच श्रीकृष्ण तिच्याकरिता धावून आले. म्हणजे काय, की आपण ज्याला आपले म्हणत असतो ते खरे आपले नसतात. आपण परमात्म्याला आपले म्हणावे, ' मी त्याचा आहे ' अशी सदासर्वकाळ आठवण ठेवावी, आणि जे जे घडत असते ते ते सर्व त्याच्याच इच्छेने होत असते ही भावना ठेवावी. अशी भावना होण्याकरिता आपण त्याची उपासना करायला पाहिजे. उपासना करणे म्हणजे तरी काय ? आपण देवाचे आहोत, आपण नेहमी त्याच्या सान्निध्यात आहोत, असे वाटणे. असे वाटण्याकरिता त्याच्या नामस्मरणात राहणे जरूर आहे. आपण त्याच्या नामस्मरणात राहिलो म्हणजे तो सदासर्वकाळ आपल्याजवळ राहतो. तुम्ही कुणाचे नाव घेतले म्हणजे त्याची मूर्ती जशी तुमच्या ध्यानात येते, त्याप्रमाणे देवाचे नाव घेतले म्हणजे तो तुमच्याजवळ असतो. देव कसा आहे हे विचारले तर कसे सांगता येईल ? तो नामात आहे हे प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीच सांगितले आहे. नाम हे त्याचे रूप. म्हणून, नामस्मरण केले म्हणजे देवाला तुमच्याजवळ येणेच भाग पडते. हे नामस्मरण कसे करावे ? समर्थांनी सांगितले आहे की, ' काहीच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ॥ ' आपण नाम घेताना काहीच करीत नाही का ? आपण त्या वेळी संसाराची काळजी करीत असतोच ना ? म्हणजेच त्या वेळी आपण आपला मीपणा ठेवून नामस्मरण करीत असतो ! मीपणारहित जो नामस्मरण करील त्यालाच देव सांभाळीत असतो; आणि जो स्वस्थ राहील त्याचा योगक्षेम देव चालवीत असतो.

आपण कोणाचे तरी होऊन राहावे.; गुरूचे तरी किंवा देवाचे तरी.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे



### संत सावतामाळी

लौकिक वैभव, प्रतिष्ठां या गोष्टींनी संतांची दिवाळी साजरी होत नाही. तर नाम संकीर्तन करणे. त्या भक्ती रंगात धुंद होऊ नाचणे. असा हा दिव्य सोहळा जेथे होईल, तीच महा दिवाळी साजरी केल्यासारखे होईल. परमात्म्याला चित्तात धारण करून अशी भक्ती करा की मुक्ती सुद्धा तुमचे दारी आपोआप येईल. भौतिक सुखे, वस्त्रालंकार, स्वादिष्ट भोजन,व वैभवाचे प्रदर्शन या गोष्टीत संतांना अजिबातच स्वारस्य नव्हते. याचे कारण असे की ,अशा कारणांनी मिळणारा आनंद हा क्षणभंगुर असतो. तो लगेच विरून जातो. संत हे शाश्वत व अखंड अशा महा नंदाच्या शोधात असतात. हा महानंद आत्म दर्शना नंतरच मिळु शकणार असतो. आणि तो या भौतिक गोष्टी विसरल्या शिवाय मिळतही नाही.

आता शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे पंजोबा श्री भानुदास महाराज काय म्हणतात ते पाहू.

उन्मनी समाधी नाठवे मनासी/ पाहता विठोबासी सुख बहु// आनंदा आनंद अवघा परमानंद /आनंदाचा कंद विठोबा दिसे// जागृती स्वप्न सुशक्ती नाठवे/ पाहता साठवे रूप मनी// नित्यता दिवाळी, नित्यता दसरा/ पाहता साजरा विठ्ठल देव// भानुदास म्हणे विश्रांतीचे स्थान/विठ्ठल निधान सापडले

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### साधी जीवनशैली:सुवर्णमध्य

आज अमेरिका व चीन या देशांसमोर वेगाचे तांत्रिक बदल आर्थिक व सामाजिक विषमता एआय हवामान बदल ही आव्हाने आहेत तिच भारतासमोरही आहे पण आपण साधी जीवनशैली आपला जुना आत्मविश्वास याने पुढे जात आहोत. कोविडचे संकट किंवा ताजे तेलसंकटातून मार्ग काढून जीवन जगत आहोत. संसाधनात तर शक्ती असतेच पण आपल्या सामाजिक कौटुंबिक व जीवनशैलीतून भारताने प्रगती केली आहे. म्हणून मा. मोदीजीने सांगितले तसे. काटकसरीने जगा, तेल कमी वापरा. आपण सायकली काढल्या!सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविला.

हा तात्पुरता बदल नाही तर आपण त्याला जीवनाचा भाग बनविले, यालाच सुवर्ण-मध्य म्हटलं जात! बघा पटतं का. ही कमजोरी नाही वा अंधविश्वास नाही. तर ती एक परंपराशैली आहे.जी साधेपणा,संयम,तपस्या व कठोरता यातून येते. जीआधी ऋषीमुनी, थोर समाजसेवक नेते ऐतिहासिक परंपरेतून येते. सोप्या भाषेत "भौतिक-
सुख अनावश्यक खर्च आणि गरजेपेक्षा साधं जीवन जगणे म्हणजे साधी जीवनशैली"! उपभोगवादी, चंगलवादीपणा ऊधलपट्टी व अनाठायी खर्च न करता साधं राहणं. पुढेही भविष्यातही कमी खर्च करून साधं रहा. कारण प्रत्येक काल्या ढगामागे एक रुपेरी किनार असते असे म्हणतात. तुर्तास इथे थांबतो गूडडे गूड मार्निंग आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



## आरोग्य संजीवनी

## यूरिक ॲसिड म्हणजे काय?

ज्योतिर्मय साहित्य

यूरिक ॲसिड वाढण्याची समस्या वेगाने वाढत आहे. वय वाढत असताना शरीरात ''गाऊट'' (आर्थरायटिस) होण्याची शक्यता जास्त असते. चुकीच्या जीवनशैलीमुळे, अयोग्य आहारामुळे आणि दिवसाच्या दिनचर्येत झालेल्या बदलांमुळे शरीरात यूरिक ॲसिड तयार होण्याची प्रक्रिया वाढते.

भोजनाच्या पचन प्रक्रियेदरम्यान प्रथिनांपासून अमिनो ॲसिडआणि प्युरिन यांपासून यूरिक ॲसिड तयार होते. हे ॲसिड रक्तामध्ये असंतुलन निर्माण करते, ज्यामुळे सांध्यांमध्ये (जोडांमध्ये) क्रिस्टल तयार होऊन वेदना होतात.

यूरिक ॲसिडची लक्षणे

१. सांधे आणि पायांमध्ये वेदना.

२. पाय, टाच आणि सांध्यांमध्ये सूज येणे.

३. एका जागी बराच वेळ बसल्यावर पायांमध्ये त्रास होणे.

४. हाताच्या बोटांमध्ये आणि सांध्यांमध्ये चुभण किंवा जळजळ होणे.

५. रक्तातील साखरेची पातळी वाढणे.

जर अशी लक्षणे जाणवली, तर लवकरात लवकर यूरिक ॲसिडची तपासणी करून घ्या.

यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी उपाय

१. आहारामध्ये हाय फायबरयुक्त पदार्थ: पालक, ब्रोकली, ओट्स, दलिया, आणि इसबगोल यांचा समावेश करा.

२. आवळा आणि अलोवेरा रस: सकाळ-संध्याकाळ जेवणाआधी १० मिनिटे प्या.

३. टोमॅटो आणि द्राक्षांचा रस: नियमित सेवन केल्यास यूरिक ॲसिड कमी होण्यास मदत होते.

४. अलसीचे बीज: प्रत्येक जेवणानंतर १ चमचा चावून खा.

५. जैतून तेलाचा वापर: स्वयंपाकासाठी तेल म्हणून वापरल्याने फायदा होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

६. अखरोट खाणे: जेवणाआधी अखरोट खाल्ल्यास पचन सुधारते आणि यूरिक ॲसिडची निर्मिती कमी होते.

७. विटामिन युक्त पदार्थ: लिंबू, संत्री, आणि इतर सायट्रस फळे खा.

यूरिक ॲसिड वाढल्यावर टाळावयाच्या गोष्टी

१. मांसाहार: मासे, मटण, आणि अंडी पूर्णपणे बंद करा.

२. बेकरी पदार्थ: पेस्ट्री, केक, बिस्किटे टाळा.

३. जंक फूड: पिझ्झा, बर्गर, आणि तळलेले पदार्थ खाणे बंद करा.

४. तिखट, मसालेदार आणि साखरयुक्त पदार्थ: या गोष्टी पचनाला हानी पोहोचवतात.

५. शराब आणि बीयर: या गोष्टींमुळे यूरिक ॲसिड अधिक वाढते.

यूरिक ॲसिड नियंत्रित ठेवण्यासाठी जीवन शैलीतील बदल

१. रोज ४५-४५ मिनिटे वेगाने चालण्याची सवय लावा.

२. योगा आणि व्यायाम नियमित करा.

३. दररोज ४-५ लिटर पाणी प्या.

४. घरातील ताजा आणि संतुलित आहार घ्या.

नियमित तपासणी आणि उपचार करा

जर यूरिक ॲसिड वाढल्याची लक्षणे दिसली, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. योग्य आहार आणि दिनचर्या यामुळे समस्या नियंत्रणात राहते.

****

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पर्यावरण

स्वच्छ,छान,सुंदर
निसर्गाचे समतोल राखण्या
करुया रक्षण पर्यावरणाचे
वृक्षसंवर्धनाचा वसा घेऊन
शुध्द प्राणवायूने मिळेल
निरोगी वरदान आरोग्याचे

झाडांमुळे निसर्गाचे खरे
पर्यावरण समतोल होवून
पावसाला पाठबळ मिळते
स्वच्छ हवेसह जमिनीची
धूप थांबून पहा
वसूंधरा हिरवळीने सजते

# जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा

**ज्योतिर्मय साहित्य**

अर्थात उत्कृष्ट भक्त कसा असावा हे श्लोक ४७ पासून वाचन व मनन करत आहोत. त्याला आपल्या विवेचनाची उत्तम जोड मिळत आहे. अन्यथा हे श्लोक म्हणजे नुसते पाठांतर असते. आणि थोडा अर्थ लावणे असते. परंतू आपल्या सखोल अभ्यासपूर्ण लेखना मुळे बऱ्याच गोष्टी स्पष्ट होत आहेत.

हा भाग ४८ अत्यंत प्रगल्भ, विचारप्रवर्तक आणि तितकाच अंतर्मुख करणारा आहे. समर्थ रामदास स्वामींच्या ४८ व्या श्लोकाचे केलेले विवेचन केवळ शाब्दिक अर्थ सांगणारे नसून, ते आजच्या जगण्याला एक निश्चित दिशा देणारे साधनेचे व्यावहारिक सुत्र बनले आहे.

**देवकाज या संकल्पनेची सुंदर व्याप्ती**

साधारण देवकाज म्हंटले की लोकांसमोर कर्मकांड, पूजा-अर्चा किंवा तीर्थयात्रा येते. परंतु, तुम्ही त्याचे वर्गीकरण करून ''स्वतः नाम घेता घेता इतरांना नामाला लावणे'' आणि ''दीनदुबळ्यांची, प्राणीमात्रांची सेवा हीच ईश्वरसेवा'' अशा दोन व्यापक आणि व्यावहारिक पातळ्यांवर जे स्पष्टीकरण दिले आहे, ते मनाला स्पर्शून जाते. गोंदवलेकर महाराज आणि समर्थ रामदास स्वामींची दिलेली उदाहरणे या विवेचनाला ऐतिहासिक आणि



आध्यात्मिक अधिष्ठान देतात.


श्लोकातील ''स्वधर्मेचीं चाले सदा उत्तमाचा'' या ओळीचे विश्लेषण करताना तुम्ही वापरलेले रंगमंच आणि कलाकाराचे रूपक अत्यंत अचूक आहे. आपल्या वाट्याला आलेली भूमिका (मग ती कौटुंबिक असो, व्यावसायिक असो की सामाजिक) प्रामाणिकपणे आणि उत्तम रीतीने निभावणे, हाच खरा स्वधर्म ही मांडणी मनातील संभ्रम दूर करते. स्वकर्मकुसुमांची पूजा याची तात्त्विक जोड फारच सखोल आहे.

विवेचनात माउलींच्या ज्ञानेश्वरीतील ओवीचा (तया सर्वात्मका ईश्वरा...) केलेला वापर या भागाचे सौंदर्य आणि खोली अनेक पटींनी वाढवतो. मंदिरात जाण्यापेक्षा आपले कर्तव्य चोख बजावणे हीच ईश्वराची स्वकर्मकुसुमांनी केलेली सर्वश्रेष्ठ पूजा आहे, हा विचार कर्मयोगाचा खरा गाभा आहे. हा विचार मांडून अध्यात्म आणि दैनिक कर्तव्य या दोन वेगळ्या गोष्टी नसून एकच आहेत, हे सहजतेने पटवून दिले आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु चा सामाजिक संदर्भ सांगताना

वैयक्तिक साधनेचा प्रवास जेव्हा समष्टीच्या कल्याणाकडे वळतो, तेव्हाच ती साधना पूर्ण होते हे छान समजावले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपला स्वधर्म पाळल्यास सज्जनांची मांदियाळी कशी तयार होईल आणि उपनिषदांमधील वैश्विक कल्याणाची प्रार्थना कशी प्रत्यक्षात येईल, हा तुम्ही जोडलेला दुवा लेखनाला एक व्यापक सामाजिक परिमाण देतो.

लेखावर बोलू काही.....
✍
विभावरी कुलकर्णी
पुणे मो. ८०८७८१०१९७



स्वसंवादाचे प्रश्न म्हणजे चिंतनाची परिसीमा आहेत.

देवकाज कुठे कुठे बघतो? याचा विचार चिंतन करायला लावतो.

दुसरा प्रश्न, ''इतरांच्या भूमिकेकडे माझे लक्ष जास्त असते का?'' हा आजच्या काळातील सोशल मीडिया आणि बाह्य जगात हरवलेल्या माणसाच्या मानसिकतेवर अचूक आणि अत्यंत गरजेचा आघात आहे.

प्रश्न तीन - आपले नामस्मरण व वागणे कसे आहे? याचे चिंतन करायला लावतो.

हा भाग वाचकाला अध्यात्माच्या अवास्तव कल्पनेतून बाहेर काढून कर्तव्य हाच धर्म या वास्तवाकडे आणतो आणि मुखात नाम व हातून सत्कर्म करण्याचा सुवर्णमध्य साधायला शिकवतो. भाषेचा ओघ, विचारांची स्पष्टता आणि संतांच्या वचनांची योग्य गुंफण यामुळे हा भाग अत्यंत संग्राह्य झाला आहे. उत्कृष्ट भक्त कसा असावा याच्या पुढील भागाची उत्सुकतेने वाट पाहत आहे!



## फ्रेंडस् ऑफ ट्रायबल सोसायटी तर्फे नि:शुल्क संगणक प्रशिक्षण केंद्र

**ज्योतिर्मय साहित्य**

बालेवाडी,पुणे - शिवराज्याभिषेक या पवित्र दिवसाचे चित्य साधून बाणेर-बालेवाडी भागातील सुप्रसिध्द समाजसेवक श्री. अशोकजी नवाल सरांच्या संकल्पनेतून व श्री.मनोजजी बेहडे अध्यक्ष फ्रेंडस ऑफ ट्रायबल सोसायटी यांच्या माध्यमातून बाणेर-बालेवाडी व प्रभागात त्यांनी पुरवठा केलेल्या संगणक संचातून वस्ती मधील गरिब व होतकरु शाळकरी मुलांसाठी नि:शुल्क संगणक केंद्राची निर्मिती सेवा वस्तीत केलेली आहे. त्या पाच महाळूंगे, बाणेश्वर मंदीर, बालेवाडी रोड श्रीलक्ष्मी माता सेवावस्ती व गंधकोश सोसायटी समोरील सेवा वस्तीतील सत्यवानजी बालवडकर यांच्या जागेतील, केंद्राच्या उद्घाटनचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या शेवटी बालेवाडी भागातील मातोजी वस्तीमध्ये राष्ट्रगीत व भारतमातेचे प्रतिमा पुजन झाले. ह.भ.प.श्री.संतोषजी बालवडकर* यांच्या दातृत्वमुळे त्यांच्या जागेत संगणक केंद्राचे उद्घाटन व *नगरसेविका सौ. रोहिणीताई चिमटे व माजी नगरसेवक *श्री.गणेशराव कळमकर* यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या कार्यक्रमा साठी समाजसेवक व महमार्ग विकासाचे अभियंता तथा गुत्तेदार *श्री.सुशिलजी अग्रवाल, ह.भ.प. श्री.संतोषजी बालवडकर, विधीज्ञ माशाळकर अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक संघ, मोरेश्वर बालवडकर भाजप उपाध्यक्ष, दै. तरुण भारतचे पत्रकार गुणवंतजी जाधवर, एफ.टी.एस चे सहकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

शबरीवस्ती नि:शुल्क संगणक प्रशिक्षणा बाबतची मुळ संकल्पना व प्रास्ताविक माहीती कार्यक्रमाचे प्रमुख सुत्रधार श्री.नवालसरांनी व एफटीएस चे अध्यक्ष श्री.मनोज बेहडे सरांनी सांगितली.

शबरी वस्ती संगणक प्रशिक्षणा बाबत सर्व मदत व महानगरपालीका स्तरावर प्रयत्न करण्या बाबतचे अभिवचन नगरसेविका सौ.रोहिणीताई चिमटे यांनी दिले. भूतपूर्व नगरसेवक श्री गणेशराव कळमकर यांनी ह.भ.प.संतोषजींच्या मदतीचा यथोचित शब्दात गौरव केला.

एका सच्च्या वारकार्याचे दर्शन होते. संतोषजींच्या या कार्यामुळे संगणक प्रशिक्षणातून अनेक वस्तीतील विद्यार्थी घडतील. ही भविष्यातील काळाजी गरज आहे या बाबतचे विचार व्यक्त केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने

संगणक प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सक्रीय सहभाग होता. उपस्थित विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आलेली होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ.पद्माजींनी केले व उपस्थीतांचे ऋणनिर्देष सचिव श्री.दिनेश मुंदडाजींनी केले.

कार्यक्रम संपन्नतेसाठी श्री.सुरेश चांडक, गिरीधरभाई राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, प्रकाशदादा बोकील, नारायणजी खांडसकर व एफटीएसचे सदस्य स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी प्रयत्न केला.

# आराधना उत्कृष्ट होण्यासाठी साधनशुद्धी महत्त्वाची

**ज्योतिर्मय साहित्य**

आराधना हा शब्दच मुळात अत्यंत परम, पवित्र, पावन, निर्मळ आणि सात्विक असा प्रतिष्ठित आहे.

आराधना म्हणजेच आपण ज्या देवतेला, दैवताला परम श्रेष्ठ स्थानी मानतो त्यांची उपासना, भक्ती, पूजा, मनोभावे स्तुती करणे. आराधना हा मूळ संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ विनम्रतापूर्वक केलेली प्रार्थना, देवतेला प्रसन्न करण्यासाठी भक्तीचे पावन अधिष्ठान असलेला सोहळा असा होतो.

आराधना : परमइष्ट आराध्य देवतेची पूजा स्तुती, वंदना, तसेच तनमनाने विनम्र होऊन एकत्व भावनेने केलेली आळवणी म्हणजे प्रार्थना. आणि याच प्रार्थनेचा परमउच्च उत्कृष्ट सोहळा म्हणजेच आराधना.

आराध्य, आराधना व आराधक : आपण ज्यांना आपल्या जीवनात आयुष्यात सर्वश्रेष्ठ स्थानी मानून त्यांची उपासना, भक्ती करत असतो, त्यांच्या मंगलमय आशीर्वादयुक्त प्रसादाची पवित्र पावन अशी अपेक्षा करत असतो त्याला आराध्य असे म्हणतात. या मंगलमय आशीर्वादाच्या प्राप्तीसाठी केलेली प्रक्रिया म्हणजेच आराधना. आणि मनोभावे शुद्ध अंतः करणाने ही प्रक्रिया जो करतो तो आराधक.

साध्य, साधन, साधक : आराध्याच्या प्राप्तीसाठी आराधक जी साधक जी आराधना करतो त्यासाठी मात्र काही अनिवार्यता, आवश्यकता असतात. त्यात महत्त्वाचे म्हणजे

१: साध्य (आराध्य प्राप्ती आणि एकरुपता),

२: साधन (आराधना किंवा भक्तीची प्रक्रिया),



३: साधक (शुद्ध सात्विक स्वरूपात असलेला आराधक).

साध्याच्या प्राप्तीसाठी आयुष्यभर प्रत्येक श्वासागणिक केलेली परिश्रमापूर्वक साधना ही प्रमाणे उत्कृष्ट होण्यासाठी साधनाशुद्धी ही सर्वात महत्त्वाची बाब ठरते. साध्याच्या शुद्ध स्वरूपात प्राप्तीसाठी साधना शुद्ध असणे आवश्यक असते. साधन शुद्ध नसेल, नसतील तर मात्र स्वाध्यायही शुद्ध किंवा संपूर्ण स्वरूपात प्राप्त होत नसते. म्हणून साधनशुद्धीला अत्यंत महत्त्व आहे. यामध्येच साधकाची साधनेशी असलेली निष्ठा प्रामाणिकता पवित्रता अंतरीक व बाह्य शुद्धी, मन वचन भाव आणि शरीराची पवित्रता याला फार मोठे महत्त्व आहे. आपल्याला जेथे पोहोचायचे त्यासाठी आपण ज्या साधनाने जातो ते साधनच व्यवस्थित उत्कृष्ट उत्तम नसेल तर ते पोहोचणे कष्ट पूर्ण होऊन त्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. हीच साधनशुद्धी. या प्रकारे आराधना करायची असते.

© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108



अनेक विचारवंतांनी, समाज सुधारकांनी, साधुसंतांनी साध्य साधन विवेक यावर अनेक ठिकाणी महत्त्वपूर्ण असे भाष्य करून त्यास मोठे महत्त्व दिलेले आहे.

आराधना आणि असफलता : अनेकवेळा, अनेक ठिकाणी आपण असे पाहतो किंवा आपल्या अनुभवास येते की अनेक लोक कित्येक वर्षापासून पूजा आजच्या आराधना करताना दिसतात परंतु त्यांच्या प्रत्यक्ष जीवनामध्ये फारसा फरक आणि शुद्धता निर्मळता सात्विकता दिसत नाही. या उलट त्यांच्यामध्ये क्रोध, मान माया, लोभ, राग, द्वेष, मद मोह, मत्सर, निर्दयता, परोपकार भावनेचा अभाव, वाचिक अशुद्धता दिसून येते. याचाच अर्थ असा की परम ईस्ट आशा सध्याच्या प्राप्तीसाठी त्यांनी केलेली साधना आराधना यामध्ये प्रामाणिकता, शुद्धता विवेकनिष्ठता, आंतरबाह्य शुद्धी व एकाग्रतेचा प्रामुख्याने अभाव असल्याने त्यांच्या साधनेचे आराधनेचे फलित पूर्णत्वास नस गेलेले व तशा सात्विक अनुभूती त्यांच्या वर्तनात दिसून येत नाहीत तर अप्रसन्नता आणि राग द्वेष अत्याधिक मोह, दुर्भावना दिसून येतात.

महत्त्वाचे : म्हणूनच आराधना उत्कृष्ट होण्यासाठी साध्य साधन विवेकाची अत्यंत प्रामुख्याने अनिवार्यता आहे. आराध्याच्या उत्कृष्ट प्रसादाची, परम पावन शुद्ध स्वरूपात प्राप्ती होण्यासाठी आराधक किंवा साधक स्वतः मध्ये किती अंतरिक शुद्ध आणि साधना आराधण्याची प्रामाणिक एकाग्र एकनिष्ठ असावा हेही अत्यंत महत्त्वाचे.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.


■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## ✍ ओळख साहित्यिकांची



### ◆ अरविंद बाबुराव कुळकर्णी

पत्ता : N/6, एम सेक्टर, प्लॉट नंबर 30, फ्लॅट नं.A/4, राज गॅलेक्सी, सिडको, छत्रपती संभाजी नगर, पिन-४३१००१

◆जन्म दिनांक - २८/२/१९६२

◆शिक्षण - बी. एस्सी. बी. एड.(गणित/विज्ञान)

◆कार्यक्षेत्र - माध्यमिक शिक्षक म्हणून गो. वि. महाजन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मलकापूर जि. बुलडाणा या शाळेत ३० वर्षे सेवा केली. (सेवानिवृत्त)

५)सध्या छत्रपती संभाजी नगर येथे राहतो.

◆आवड - काव्यलेखन, वाचन, पर्यटन.

◆उपक्रम - शाळेत असतांना गणित विषयाचे जादा वर्ग, विज्ञान उपकरण निर्मिती, विज्ञान मेळावा आयोजन, परीक्षण, स्पर्धा ई. कार्य. गणित / विज्ञान विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून राज्य/ जिल्हा/तालुका स्तरावर काम केले.

गणित विषयाचे १० वी अमरावती परीक्षा मंडळात परीक्षण तसेच १९ वेळा नियामक तसेच मुख्य नियामक अंतर्गत मूल्यमापन, फेरमूल्यांकन, समीक्षण ही कामे यशस्वीरित्या पूर्ण केली.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत दोन वेळा जिल्ह्यातून प्रथम. कविवर्य विठ्ठल वाघ यांच्या हस्ते पुरस्कार. सन २००३ मधे राज्यातून निवडक १० पुरस्कारात निवड होऊन मा.शिक्षण संचालक यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त झाला.

मराठी विज्ञान परिषदे अंतर्गत निबंध लेखन स्पर्धेत २ वेळा विदर्भातून प्रथम तसेच एकदा राज्यातून तृतिय क्रमांक मिळाला.

बारामती येथे भारताचे विज्ञान सल्लागार मा.डॉ.अनिल काकोडकर, उद्योजक मा.श्री.विश्वास चितळे, जलतज्ञ मा.श्री. सुरेश खानापूरकर, मा. श्रीमती सुनेत्राताई पवार यासारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत प्राप्त झाला.

विज्ञान शिक्षक संघटना बुलडाणा यात १० वर्षे विज्ञान प्रसार, प्रदर्शने, भाषण स्पर्धा असे विविध उपक्रम केले.

वीपनेट (विज्ञान प्रसार नेटवर्क दिल्ली) या संस्थेच्या माध्यमातून उपक्रम व फिरती प्रयोगशाळा, अंधश्रद्धा व व्यसनातून मुक्तीसाठी काम यात सहभाग होता.

सेवानिवृत्ती नंतरच्या काळात काव्य निर्मिती, काव्य संमेलने, जुन्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन असा दिनक्रम आहे. काव्य निर्मिती प्रकारात ५०० विविध काव्यरचना व प्रसंगानुरूप लेख लिहिले आहेत. दैनिक, साप्ताहिके, मासिके यातून लेख व कविता प्रकाशित. प्रामुख्याने त्यातून देशभक्तांचे कार्य, देशभक्ती, सामाजिक सुधारणा, अभंग रचना असे सर्व प्रकार समाविष्ट आहेत. सर्वद फाऊंडेशन, मुंबई यांच्याकडून राज्यस्तरीय सर्वद स्टार उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार २०२४ प्राप्त झाला आहे. यावर्षी तितिक्षा प्रमोद मातृगौरव पुरस्कार २०२६ पुणे येथे सन्मानपूर्वक प्राप्त झाला. मागील वर्षी अद्वैत हा माझा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. यावर्षी छत्रपती संभाजी नगर येथे सध्या वेळ मिळेल तसे काव्य सादरीकरण कार्यक्रमात सहभाग घेतो. ज्योतिर्मय साहित्य समूहा अंतर्गत साहित्य क्षेत्रात नवनवीन संधी मिळत आहे.धन्यवाद !

◆अरविंद कुळकर्णी, छत्रपती संभाजीनगर
मो.९८२२६४२२९४

## मुलांसाठी लघु बोधकथा



### ◆लबाड कोल्हा◆





एका कोल्ह्याचे शेपूट लोखंडी सापळ्यात सापडले असता ते तोडून तो पळाला. प्रथम त्याला आनंद झाला की प्राणांवरचे शेपटीवर निभावले. पण जेव्हा तो आपल्या मंडळीत जाऊ लागला, तेव्हा त्याला आपल्या लांडेपणाचे फार वाईट वाटून तो मनात म्हणाला, 'मी मेलो असतो तर बरं झालं असतं. पण ही अप्रतिष्ठा वाईट, पण जे झाले त्याला उपाय नाही. आता हेच कसं शोभवून नेलं म्हणजे झालं ! यासाठी काय बरं युक्ती करावी ?' याचा तो विचार करीत असता त्याला एक युक्ती सुचली ती अशी की आपण सर्व कोल्हे मंडळींना एकत्र जमवून सांगावे की, 'माझी शेपटी मी तोडून टाकून ही भूषणाची नवी पद्धत काढली आहे. ही चांगली आहे अन् तुम्हीसुद्धा अवश्य करावं.' मग त्याने सगळ्या कोल्ह्यांना आपल्या घरी बोलावले व आपल्या युक्तीप्रमाणे त्यांच्यापुढे भाषण दिले. तो म्हणाला, 'अहो, या शेपटीपासून काहीच फायदा नाही. आपल्याला शेपटी म्हणजे ओझंच. शेपटी तोडून टाकल्यानं एक प्रकारचं सौंदर्य येऊन शिवाय पळण्यातली अडचण दूर होते. मी ह्या गोष्टीचा अनुभव घेतला आहे नि शेपटी तोडल्यापासून सुखी आहे. हे सुख तुम्हाला प्राप्त व्हावं असं मला वाटलं.' इतके बोलून आपले कितीजण ऐकतात हे पाहण्यासाठी तो सगळ्यांकडे पाहू लागला. इतक्यात एक म्हातारा कोल्हा त्याची लबाडी ओळखून मान वाकडी करून म्हणाला, 'अहो, पंडित महाराज, आपली हुषारी पुरे. शेपटी काढल्यामुळे तुमचं कल्याण झालं असेल, यात शंका नाही. अन् आमच्यावर जेव्हा वेळ येईल तेव्हा आम्हीही आपली शेपटी कापून टाकू. तोपर्यंत तुम्ही आम्हाला आग्रह करू नये हेच बरं.'

तात्पर्य - आपली अप्रतिष्ठा होऊ नये म्हणून आपले दोष हे नसून गुण आहेत असे बरेचजण सांगतात पण शहाणे लोक त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाहीत.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताची वाटचाल

ॲड.प्रा. कौशिक म. हरणे. मो.- 96731 75197






काळ बदलतो तसेच तंत्रज्ञान बदलते आणि त्यासोबतच जगाची दिशा देखील बदलते. वाफेच्या इंजिनाने औद्योगिक क्रांती घडवली, विजेने आधुनिकतेला गती दिली, तर इंटरनेटने संपूर्ण जगाला एकत्र आणत एका जागतिक गावात रूपांतरित केले. आज आपण अशाच एका नव्या क्रांतीचे साक्षीदार आहोत आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्यायुगाचे, जे मानवी विकासाची व्याख्या नव्याने लिहित आहे. औद्योगिक क्रांतीने जगाची आर्थिक रचना बदलली, इंटरनेट क्रांतीने माहितीच्या प्रवाहाला वेग दिला आणि आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स मानवजातीच्या विकासाचा नवा अध्याय लिहित आहे. आज जगातील राष्ट्रांची आर्थिक, औद्योगिक आणि सामरिक ताकद केवळ नैसर्गिक संसाधनांवर किंवा लोकसंख्येवर मोजली जात नाही, तर ती त्यांच्या तांत्रिक क्षमतेवर, नवकल्पनांवर तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स मधील नेतृत्वावर अवलंबून आहे.

आजची जागतिक शर्यत भूभागांच्या सीमांवर नव्हे, तर तंत्रज्ञानाच्या सीमांवर लढली जात आहे. सोनं आणि तेलाच्या युगानंतर आता डेटा, सेमीकंडक्टर आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स हेच राष्ट्रांच्या सामर्थ्याचे नवे मापदंड बनले आहेत. ज्या देशांकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन क्षमता आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स मधील नेतृत्व असेल, तेच भविष्यातील जागतिक अर्थव्यवस्था, सामरिक धोरणे आणि राजकीय समीकरणांवर निर्णायक प्रभाव टाकतील.' अलीकडेच तैवान आणि दक्षिण कोरिया यांनी शेअर बाजाराच्या एकूण मूल्यांकनाच्या बाबतीत भारताला मागे टाकले आहे. भारत आता आठव्या क्रमांकावर असून तैवान सहाव्या आणि दक्षिण कोरिया सातव्या क्रमांकावर पोहोचले आहेत. हा बदल केवळ आकड्यांचा खेळ नाही; तर तो जागतिक आर्थिक शक्तींच्या बदलत्या स्वरूपाचा संकेत देखील आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सेमीकंडक्टर, उच्च क्षमतेची मेमरी, डेटा सेंटर्स आणि संशोधनातील सातत्यपूर्ण गुंतवणूक यामुळे या देशांनी अभूतपूर्व प्रगती साधली आहे. सध्याच्या जागतिक परिदृश्यात अमेरिका आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातील निर्विवाद महासत्ता म्हणून उदयास आली आहे. जगातील सर्वात मोठ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपन्या, संशोधन संस्था आणि तंत्रज्ञान गुंतवणूकदार अमेरिकेत आहेत. क्रमशः......

# मराठीचा घसरलेला टक्का !


ज्योतिर्मय साहित्य

परवा क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट पाहिला. आजच्या गल्लाभरू चित्रपटांच्या दुनियेत एका वेगळ्या विषयावरचा हा चित्रपट पाहताना आनंद वाटला. मराठी शाळांची खालावत चाललेली धक्कादायक अवस्था आणि अस्तित्वाचा संघर्ष या चित्रपटाने अत्यंत ढळढळीतपणे समाजासमोर आणला आहे. हा चित्रपट पाहत असताना मला नुकताच काही दिवसांपूर्वी लागलेला इयत्ता दहावीचा निकाल आठवला. निकालानंतर वर्तमानपत्रात ठळक अक्षरांमध्ये एक मथळा (हेडलाईन) प्रसिद्ध झाला होता दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात ९४,००० विद्यार्थी अनुत्तीर्ण ! आपल्याच मातृभाषेला दुय्यम स्थान दिल्यामुळे मुले चक्क मराठीत नापास झाली आहेत. ही संख्या थोडीथोडकी नाही.




'' मला सगळ्या विषयात चांगले मार्क आहेत पण फक्त मराठीत गेलो ...'' दहावी उत्तीर्ण एका विद्यार्थ्याचे हे उद्गार ! आम्हाला सगळ्या विषयात चांगले मार्क्स असले तरी आमच्या टॉप फाईव्ह मध्ये मराठी नसते. ''आमची उज्ज्वल यशाची परंपरा ! आम्ही सर्व विषयांची उत्तम तयारी करून घेतो,'' असे मोठे मोठे बोर्ड लावणारे क्लासेस मराठी विषयाची तयारी करून घेताना कुठे जातात ?

एका बाजूला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आपण आनंदाने आणि अभिमानाने स्वतःची पाठ थोपटून घेत आहोत; अर्थात, यात वावगे काहीच नाही. पण खरंच माझी मराठी टिकावी, तिची समृद्धी आणखी वाढावी यासाठी आपण मुळापासून काही प्रयत्न करतो आहोत का ? जेव्हा मुलांच्या मराठीतील नापासांचे हे धक्कादायक प्रमाण समोर येते, तेव्हा आपण क्षणभर गडबडतो, आपल्याला धक्काही बसतो. पण तो तेवढ्यापुरताच! या स्थितीला जबाबदार असलेला प्रत्येक घटक आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होतो. मुले म्हणतात, शाळेत मराठीचे तास नियमितपणे झालेच नाहीत. बऱ्याच वेळा मराठीचे तास दुसऱ्या विषयाला वापरले जातात. मराठी काय घरीही अभ्यासता येईल. अशी मानसिकता निर्माण केली जाते. दहावीचे शिक्षक म्हणतात, मुले आमच्याकडे येताना खालूनच कच्ची आली. प्रत्येकजण अशा सबबी देऊन आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होत असतो. पण या विषयावर आपण कधी मुळापासून यावर विचार करणार आहोत की नाही ?




असर (अॅन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) चा मागील एक अहवाल सांगतो की, जी मुले दहावीत होती, त्यांना इयत्ता तिसरीत असताना पहिलीचे मराठी धडे वाचता येत नव्हते; तर आठवीत असताना दुसरीच्या स्तरावरील उतारा वाचता येत नव्हता. आज इतक्या वर्षांनंतरही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. आपल्या मुलांचे मार्कांचे एकूण टक्के वाढले असतीलही, पण ज्ञानाचा आणि मराठीचा खरा टक्का मात्र घसरला आहे. मराठी साहित्य संमेलनांचे भव्य आयोजन करणे, पुस्तक प्रदर्शने भरवणे किंवा दुकानाच्या पाट्या मराठीत लिहायला लावणे या गोष्टी भाषेच्या प्रसारासाठी उपयुक्त असतीलही; पण जोपर्यंत आपण मूळ आजारावर उपाय करत नाही, तोपर्यंत ही परिस्थिती सुधारणार नाही.

ज्यांनी शांतिनिकेतनची स्थापना केली, ते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर बंगाली भाषेबाबत कमालीचे आग्रही होते. त्या काळात बंगालमधील सरकारी नोकरदार आणि मध्यमवर्गीय लोक आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालण्यात आणि इंग्रजी बोलण्यात धन्यता मानत होते. अशा विपरीत परिस्थितीत गुरुदेवांनी ''मातृभाषेतील शिक्षण हेच सर्वात उत्तम शिक्षण'' असल्याचा उद्घोष केला. केवळ बोलून न थांबता त्यांनी शांतिनिकेतनमध्ये केवळ बंगालीतूनच शिक्षण देण्यास सुरुवात केली आणि पाठ्यपुस्तकेही बंगालीत तयार केली. आमार जीवन, आमार बानी (माझे जीवन, हीच माझी वाणी) हे त्यांचे घोषवाक्य होते. आम्ही मात्र आज स्वातंत्र्याला ऐंशी वर्षे होत आली, तरी इंग्रजी भाषेचे गोडवे गाण्यातच मग्न आहोत.

एकदा एका विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला रवींद्रनाथांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. त्या काळी असे समारंभ आणि त्यातील भाषणे केवळ इंग्रजीतूनच होत असत (जी आजही होतात). उपस्थितांचीही तीच अपेक्षा होती; पण गुरुदेवांनी तो सगळा इंग्रजी राजशिष्टाचार (प्रोटोकॉल) धुडकावून लावला आणि थेट बंगालीत भाषण करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. आपल्या भाषेचा असा अभिमान आपल्यात कधी जागी होणार ?

आपले सरकार इंग्रजी शाळांना धडाधड परवानग्या देत आहे आणि दुसरीकडे मराठी शाळांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. ''मराठी शाळांचा दर्जा खालावला आहे'' असा बागुलबुवा उभा करून पालकांनी आपल्या मुलांना मराठी शाळांमध्ये पाठवणे बंद केले. परिणामी, विद्यार्थी नाहीत हे कारण पुढे करून शासनाने शाळा बंद करण्याचा सपाटा लावला आहे. ज्या काही शाळा आज कशाबशा सुरू आहेत, त्यांची अवस्था केविलवाणी आहे; कुठे छप्पर गळतेय, तर कुठे पुरेसे शिक्षक नाहीत.

क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटात हेच विदारक वास्तव अचूक मांडले आहे. विद्यार्थीसंख्या कमी झाली म्हणून शासनाकडून शाळा बंद होण्याची टांगती तलवार जेव्हा मानेवर येते, तेव्हा त्या शाळेचे मुख्याध्यापक दिनकर शिर्के (सचिन खेडेकर) शाळा वाचवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांना हाक मारतात. हा चित्रपट आपल्याला एक मोठा धडा देतो. सरकार शाळा बंद पाडत असले आणि समाज उदासीन असला, तरी ज्या शाळेने आपल्याला घडवले, तिच्या पडत्या काळात तिच्या पाठीशी उभे राहणे ही प्रत्येक माजी विद्यार्थ्याची आणि समाजाची नैतिक जबाबदारी आहे. हे दुष्टचक्र मोडून काढण्यासाठी समाज, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि शासन या सर्वांनी आता एकत्र यायलाच हवे.

मी मराठी, माझी शाळा मराठी हे आता केवळ वाक्य न राहता आपले ब्रीदवाक्य व्हायला हवे. आमचा इंग्रजीला अजिबात विरोध नाही, ती काळाची गरज म्हणून महत्त्वाची भाषा आहेच आणि ती पुढेही शिकता येते. पण ज्या गोष्टी मातृभाषेतून आमचे मूल सहजपणे आणि आत्मविश्वासाने शिकू शकते, त्या गोष्टी सुरुवातीलाच परक्या भाषेतून लादून त्याच्यावर ताण का आणायचा ? मराठी शाळांमधून केवळ कोरडे शिक्षण दिले जात नाही, तर आपली संस्कृती, शिष्टाचार आणि उत्तम संस्कार तिथे जोपासले जातात. जर आपल्याला आपली संस्कृती टिकवायची असेल आणि मुलांवर सुसंस्कार हवे असतील, तर मराठी शाळा आणि मराठी माध्यम अपरिहार्य आहे.

**(क्रमशः)**


# मराठी रंगभूमीवर सध्या कमालीची चर्चा घडवून आणणारे आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटक म्हणजे ''ॲनिमल''

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

**अष्टपैलूत्व:**

एका बाजूला गावाकडच्या दत्तूची निरागसता, त्याचा मार्मिक विनोद आणि दुसरीकडे अपयशामुळे येणारे नैराश्य, मानसिक कोंडी अन् त्यातून येणारे हिंसक वेडेपण... हा संपूर्ण प्रवास सिद्धार्थने कमालीच्या ताकदीने अभिनयातून उतरवला आहे.




एकपात्री आव्हान पेलणारा सिद्धार्थ पूर्ण वेगळा भासला. संपूर्ण रंगमंचावर एकट्याने वावरताना, प्रेक्षकांना खिळवून ठेवणे हे अत्यंत कठीण काम असते. सिद्धार्थ आपल्या संवादांच्या चढ-उताराने आणि अप्रतिम देहबोलीने यात पूर्ण यशस्वी ठरला आहे. त्याच्या कारकिर्दीतील हा सर्वोत्तम आणि अत्यंत आव्हानात्मक प्रयोग मानला जाईल.

नाटक बघताना लेखन व दिग्दर्शन यातील वेगळेपण आणि चालू घडामोडी जोडण्याचे कौशल्य अप्रतिम!




लेखन आणि दिग्दर्शन करताना महेश मांजरेकर यांनी चंदेरी दुनियेतील स्ट्रगलर्सचे जग अत्यंत सूक्ष्मतेने पाहिले आहे, जे त्यांच्या लेखनातून आणि दिग्दर्शनातून स्पष्ट जाणवते.

**मूक कलाकार**

नाटक एकपात्री असले, तरी रंगमंचावर काही मूक कलाकार वावरतात, ज्यांच्याशी दत्तू संवाद साधतो. हे कलाकार तितक्याच ताकदीने साथ देताना दिसून आले. हे कलाकार म्हणजे पार्श्वसंगीत असावे असे भासले. त्यांचे अस्तित्व व मूक अभिनय अत्यंत आवश्यक व नेटका आहे.

मांजरेकरांनी कोणतीही भव्य पडदा-सिने तंत्रे, विविध चमकदार भपकेबाज कपडे न वापरता केवळ प्रकाशयोजना आणि अभिनयाच्या जोरावर नाटक प्रवाही ठेवले आहे. संगीताची जोड: नाटकात वापरलेले बॅकग्राउंड स्कोअर, इको आणि रेव्हर्ब इफेक्ट्स, तसेच काही बॉलिवूड गाण्यांचा अचूक वापर दत्तूच्या मनातील गोंधळ आणि भीती प्रेक्षकांपर्यंत अचूक पोहोचवतो.

**सकारात्मक बाजू**

सिद्धार्थ जाधवचा संयत आणि तितकाच आक्रमक अभिनय, ज्यासाठी हे नाटक पाहायलाच हवे. तल्लख दिग्दर्शन आणि तांत्रिक बाजू उत्कृष्ट! हलते-फिरते मिनिमल सेट आणि प्रभावी ध्वनीसंयोजन यामुळे नाटकाचा वेग कुठेही कमी होत नाही.

सत्य परिस्थितीवर असलेले भाष्य प्रेक्षकांना पटते. इंडस्ट्रीतील नवोदितांची होणारी कुचंबणा आणि महानगरातील वेगवान जीवनशैलीवर केलेले मार्मिक भाष्य मनाला भिडते.

गंभीर आणि गडद (डार्क ) शेवट मनाला चटका लावून जातो. नाटकाचा क्लायमॅक्स अत्यंत अनपेक्षित आणि काहीसा अस्वस्थ करणारा आहे. त्यामुळे निखळ मनोरंजनाची अपेक्षा ठेवून जाणाऱ्या प्रेक्षकांना हा शेवट धक्कादायक वाटू शकतो.

उत्तरार्धात पात्राचा मनोरुग्णतेकडे आणि क्रूरतेकडे जाणारा प्रवास पाहताना काही मनावर ताण येऊ शकतो.

एका डोळ्यात आसू एका डोळ्यात हासू, मनात उत्सुकता आणि मेंदूवर हलकासा ताण घेऊन नाटक बघितले जाते. दुसऱ्या अंकातील विरोधाभास वारंवार कल्पने पलीकडचे धक्के देतो.

ॲनिमल हे केवळ एक नाटक नाही, तर ती एका कलाकाराच्या अस्तित्वाची आणि तुटत जाणाऱ्या स्वप्नांची जीवघेणी कहाणी आहे. महेश मांजरेकर यांचे अचूक दिग्दर्शन आणि सिद्धार्थ जाधवच्या अभिनयाची लाइव्ह जादू अनुभवण्यासाठी हे नाटक रंगभूमीतच जाऊन नक्कीच पाहिले पाहिजे. व्यावसायिक नाटकांच्या चौकटीबाहेर जाऊन काहीतरी दर्जेदार आणि विचार करायला लावणारे पाहू इच्छिणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही एक उत्तम पर्वणी आहे.

# 'वेडा कोण खुळा कोण' इकडे युद्धबंदी आणि तिकडे हल्ले प्रति हल्ले

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

ट्रम्प यांचा हा युक्तिवाद नेत्यानाहो यांना जमिनीवर आणण्यासाठी शॉर्ट ट्रीटमेंट देणारा आहे. आता नेत्यानाहोनी हवेत चालणे बंद करावे आणि जमिनीवर यावे व त्यांनी शस्त्र संधी अडचणीत येईल अशा कारवाया करू नयेत असाच ट्रम्प यांच्या धमकीचा गर्भित अर्थ आहे.

ट्रम्प यांनी यापुढे उपद्व्याप चालूच राहिले तर इजरायल जागतिक स्तरावर एकाकी पडण्याचा धोका आहे. असेही नेत्यानाहो यांना सूनविले पण एवढ्याने सुद्धा नेत्यानाहो जमिनीवर आले नाहीत त्यांनी लेबनॉन मधील हीजबुल विरोधी कारवाई सुरूच राहील असे ठणकावून सांगितले याचा अर्थ असा की नेत्यानाहो ट्रम्प यांचे चांगलेच बिनसले आहे.

**शाब्दिक चकमकीचा अन्वयार्थ**

अध्यक्ष महोदय डोनाल्ड ट्रम्प आणि महामहीम बींजामिन नेत्यानाहो यांच्यातील ही शाब्दिक चकमक ऑक्सिओस या संकेतस्थळावर प्रकाशित झाली आणि तिने जगभर खडबडून दिली.

राजकारणात जेव्हा विवेक संपतो तेव्हा ओवी ऐवजी शिवी वापरली जाते तसेच काहीसे ट्रम्प यांचे झाले. त्यांनी आम्हा घरी शब्दाचीच रत्ने शब्दाचीच शस्त्रे यत्न करू या न्यायाने आपल्या मित्राला वेडे खुळे ठरविले. ते म्हणाले मी नसतो तर तुमची रवानगी आज तुरुंगात झाली असती मी तुम्हाला वाचवीत आहे प्रत्येक जण इस्रायलचा यामुळे द्वेष करत आहे या शाब्दिक चकमकीचे प्रामुख्याने तीन अर्थ निघतात पहिले म्हणजे ट्रम्प नेत्यानाहो यांच्यातील मतभेद तीव्र झाले आहेत, दुसरे म्हणजे ट्रम्प हे नेत्यानाहो यांच्या लेबनान मधील कृतीमुळे अडचणीत येत आहेत याचे त्यांना दुःख वाटते. तिसरे म्हणजे आता इजरायल ने थोडासा माघारीचा पवित्रा घ्यावा असे ट्रम्प यांना सुचवावयाचे आहे. खरे तर इजरायल मध्ये येऊ घातलेल्या निवडणुकांमधील पराभव टाळावयाचा असेल तर नेत्यानाहो एक पाऊल मागे टाकणे अधिक शहाणपणाचे ठरेल. कारण आपण युद्ध जिंकले या थाटात ते असले तरीही त्यांनी आता थोडे थांबले पाहिजे. तसे त्यांनी केले नाही तर डाव त्यांच्या अंगावर उलटू शकतो.

या शाब्दिक चकमकीचा आणखी एक अर्थ असा आहे की आता नेत्यानाहो यांच्या चुका चे कटू फळ आपल्या अंगावर घेण्यास ट्रम्प तयार नाहीत, त्यांनी ही सर्व फळे झटकून टाकली आहेत.

**नेत्यानाहोचे भविष्य काय**

अमेरिका आणि इजरायल यांच्यातील राजकीय दरी वाढली तर त्याचा फायदा इराणला होऊ शकतो तिकडे युद्धबंदीची चर्चा चालू असताना इकडे नेत्यानाहो महोदय लेबनॉन वर हल्ला करण्याचे आदेश देतात तरी कसे असा ट्रम्प यांना रास्त प्रश्न पडला आहे. इराणने इस्रायलच्या कृतीसाठी अप्रत्यक्षपणे अमेरिकेला जबाबदार धरले आणि इजराइलची ही कृती म्हणजे शस्त्र संधीचा भंग आहे असा युक्तिवाद केला. त्यामुळे वैतागलेल्या ट्रम्प यांनी थेट नेत्यांनी धारेवर धरले. अध्यक्ष महोदय डोनाल्ड ट्रम्प यांच्या दूरध्वनीनंतर सुद्धा इजरायलने लेबनॉन वरचे हल्ले चालूच ठेवले आणि या हल्ल्यात लेबनॉन मधील आठ जण दगावले. त्यामुळे इराण अधिक अस्वस्थ होणे सहाजिक आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी खरोखर बिंजामिन नेत्यानेहू यांचा पाठिंबा काढून घेतला तर ते चांगलेच अडचणीत सापडतील. एक तर त्यांचे अंतर्गत शत्रू इजरायल मध्ये डोके वर काढतील, दुसरे म्हणजे तेथील संसदेत त्यांच्याविरुद्ध प्रलंबित असलेली चौकशी पुन्हा सुरू होईल आणि त्यामध्ये ते अडचणीत सापडतील. युद्धजन्य परिस्थितीमुळे लांबणीवर पडलेल्या इजराइल मधील निवडणूक या धामधुमीत झाल्या तर मग नेत्यानाहो यांना चांगलाच मार बसेल आणि त्यांचे राजकीय पितळ उघडे पडेल म्हणून त्यांनी शहाणपणाचा मार्ग स्वीकारावा व डोनाल्ड ट्रम्प यांना साथ द्यावी त्यातच त्यांचे खरे हित आहे. पण विनाशकाले विपरीत बुद्धि म्हणतात त्याप्रमाणे त्यांचे डोके ठिकाणावर कधी येणार हा खरा प्रश्न आहे.




**मर्यादित कराराचे जाळे**

आरंभी डोनाल्ड ट्रम्प समजत होते तेवढे इराण हे प्रकरण सोपे नाही. इराणने अमेरिके पुढे मर्यादित कराराचे जाळे टाकले आहे. त्यामध्ये ट्रम्प यांचा मासा अडकतो की नाही ते पाहण्यासारखे आहे या मर्यादित कराराची आखणी करताना इराणने केलेल्या मागण्या मोठ्या अर्थपूर्ण आहेत.




लेबनन सह सर्व आघाड्यावरील युद्ध संघर्ष ताबडतोब थांबवावा अशी इराणची पहिली मागणी आहे, तसेच त्याबरोबर त्यांनी असेही म्हटले आहे की अमेरिकेने नौदल नाकेबंदी त्वरेने उठवावी. तसेच कच्च्या तेलाचा पुरवठा करण्यास परवानगी द्यावी. शिवाय अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधाच्या दरम्यान इराणचे अब्जावधी डॉलर्स अमेरिकन बँकेत पडून आहेत हा महसूल इराणसाठी खुला करावा. या सर्व मागण्या इराणने समोर ठेवल्या आहेत.

इराणची ही मर्यादित कराराची मागणी मोठी शहाणपणाची आहे. सर्वस्वी अमेरिकेचे म्हणणे मान्य न करता आपल्या फायद्याचे जे आहे ते आता पदरात टाकून घ्यावयाचे अशी इराणची चाल आहे. डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या या खेळीमध्ये किती अडकतात कसे चतुराईने सामोरे जातात हे आता पहावे लागेल नव्या जगामध्ये प्रत्यक्ष युद्धे लढण्यापेक्षा बुद्धिमत्ता आणि चातुर्याने विजय मिळविणे महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे अमेरिकेला खेळविण्यात इराण बराच यशस्वी ठरला आहे असे म्हणावे लागेल.

या मर्यादित कराराला सामोरे जाताना अमेरिकेला धोकेही समोर दिसत आहेत कारण इराणला या कराराच्या आधारे सोई सवलती मिळेल, थोडा वेळ ही मिळेल आणि पुन्हा अमेरिकेबरोबर चार हात करायला तयार होईल हा कालहरणाचा धोका लक्षात घेऊन अमेरिका या अटी मान्य करेल असे वाटत नाही. कारण अधिक सर्वसमावेशक, अधिक व्यापक शांतता प्रस्ताव व्हावा आणि तो अमेरिकेच्या हिताचा असावा असे अमेरिकेतील जनमत सुद्धा म्हणत आहे. खुद्द रिपब्लिकन पक्षातील काही खासदारांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी आता अचानक माघार घेतल्यास मग ऑपरेशन फ्यूरीचे फलित काय असा प्रश्न उभा केला आहे. त्यामुळे इकडे आड तिकडे विहीर अशा परिस्थिती डोनाल्ड ट्रम्प सापडले आहेत ही गोष्ट अधोरेखित केली पाहिजे.

**आशा वाद खरा ठरेल काय**

युद्ध थांबेल आणि आठवडाभरात शांतता होईल असे चित्र दिसत आहे पण हे शांततेचे मृगजळ ठरू नये. रात्र थोडी आणि सोंग फार अशी जगाची अवस्था झाली आहे.

पुढील आठवड्यात सर्वसमावेशक युद्धबंदी करार होईल आणि जगात शांतता प्रस्थापित होईल असा आशावाद डोनाल्ड ट्रम्प महोदयांनी व्यक्त केला आहे. त्यांचा हा अशावाद सार्थ ठरावा म्हणजे युद्ध थांबेल आणि जग इंधन टंचाई व महागाईच्या संकटातून मुक्त होऊ शकेल. परंतु अमेरिका आणि इराण मधील संदोपसुंदी वाढत आहे तेच कायम आहे अशावेळी अमेरिकेचे अध्यक्ष महोदय थोडा शांतता आणि विवेकाचा दृष्टिकोन स्वीकारतील काय हा खरा प्रश्न आहे. पुढील आठवड्या पर्यंत वातावरण सकारात्मक किती राहील हा प्रश्न पडतो. अमेरिका इराण बरोबर चे संबंध सुधारण्यासाठी किती उत्सुक आहे हा प्रश्न आहे, खरे तर समुद्रधुनी मुक्त करणे खाली करणे हे केवळ अमेरिका आणि इराणसाठीच नव्हे तर साऱ्या जगासाठी फलदायी ठरू शकते. पण वारंवार उलट सुलट वक्तव्य केल्यामुळे संशयाचे वातावरण तयार होते. एकीकडे इराण चर्चेला तयार होत असताना दुसरीकडे अमेरिका मात्र वेगळेच नवे वाद विषय उकरून काढते. त्यामुळे चर्चा कशी यशस्वी होईल. ट्रम्प महोदयांनी एकीकडे नेत्यांनी यांना धारेवर धरले तर दुसरीकडे इराणने अमेरिका विरोधात धार कायम ठेवली आहे. त्याला इराणने स्पष्ट उत्तर दिलेले नाही त्यामुळे अजूनही तेच प्रसंग मोठा बाका आहे. या दोन भांडणाऱ्या शक्तीमध्ये रणसंग्राम काही थांबत नाही हार्मुज समुद्रधुनी मोकळी कशी होईल, वाहतूक कशी सुरळीत होईल आणि जागतिक पातळीवर समस्यांची गुंतागुंत कशी सुटेल याकडे राजकीय पंडितांचे लक्ष लागले आहे. हार्मोज एकदाची युद्धबंदी व्हावी तह व्हावा आणि हार्मुजची समुद्रधुनी सर्वांसाठी खुली व्हावी यातच सर्वांचे शहाणपण आहे. परंतु नसत्या उठाठेवी वाढत आहेत आणि जागतिक ऊर्जापुरवठा साखळी मात्र अजूनही सुधारत नाही. जगातील ऊर्जा संकट सुटले पाहिजे आणि विस्कटलेली घडी पुन्हा सुरळीत झाली पाहिजे त्यातच जगाचे भले आहे.

**समारोप**

मागील दोन आखातीयुद्धापेक्षा या वेळची आखात युद्ध चांगलेच लांबले आहे. काही केल्या युद्ध थांबता थांबत नाही. त्यामागे डोनाल्ड ट्रम्प यांचा हट्टीपणा जसा कारणीभूत आहे तसा इराणचा नकारात्मक दृष्टिकोन ही तेवढाच धोकादायक आहे. ट्रम्प यांनी नेत्यांनी यांना घरचा आहेर केला आणि त्यांना वेडा व खुळा म्हटले पण त्यांच्या या वाटाण्याच्या अक्षताचा अर्थ बिंजामिन नेत्यांनाहो यांना किती कळतो हे आज सांगता येणार नाही. कोण वेडा कोण खुळा हे आता इतिहास ठरवेल. खरे तर इकडे युद्धबंदीचे नाटक आणि तिकडे हल्ले प्रति हल्ले हा दुटप्पीपणा जगाला युद्धाच्या खाईत लोटणारा ठरला आहे. या सर्व गुंतागुंतीचा अर्थ असा की आता मर्यादित शांतता कराराची नव्हे तर संपूर्ण शांतता कराराची गरज आहे. आणि असा प्रस्ताव दोघांनीही मान्य करावा आणि तिसरा पक्ष म्हणून इजराइलने सुद्धा थोडीशी माघार घ्यावी एक पाऊल पुढे टाकण्यासाठी एक पाऊल मागे घेणे कधीही शहाणपणाचे असते हे बेंजामिन नेत्यांनी यांना कळेल काय आणि डोनाल्ड ट्रम्प यांनी फार ओलांडोळ्या न घेता आता युद्ध थांबविणे तीनही पक्षांना आणि समग्र मानव जातील हितकारक ठरू शकते. त्यामुळे जगाला युद्ध नको बुद्ध हवा आहे महावीर हवा आहे हे अमेरिका इराण आणि इजराइलला कळेल तो सुदिन म्हटला पाहिजे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559